महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, अनुसूचि "ड" प्रकरण ८ नियम ४१ अन्वये मालमत्ता कराच्या थकीत रक्कमेवर आकारण्यात आलेल्या शास्तीच्या रक्कमेमधून नियम ५१ अन्वये सुट प्रदान करणेकरीता विशेष योजना राबविणेबाबत.

# अमरावती महानगरपालिका अमरावती

जा.क्र. अमनपा/आयु/करवि/१५६/२०२५
दि. ०७/१२/२०२५

## आदेश –

महानगरपालिका क्षेत्रातील सर्व मालमत्ता धारकांना सन २०२५-२०२६ या आर्थीक वर्षाकरीताची थकबाकीसह कराची देयके निर्गमित करण्यात आले आहेत. सन २०२५-२०२६ मधे मालमत्ता धारकांनाकडून प्राप्त हरकतींच्या अनुषंगाने संबंधीत मालमत्तांच्या कर आकारणीमध्ये मोठया प्रमाणात सुधारणा करणेबाबत वेळोवेळी आदेश निर्गमित करण्यात येवून सुधारीत देयके संबंधीत मालमत्ता धारकांना उपलब्ध करण्यात आली आहेत. तसेच दर शनिवारी व रविवारी झोनचे कार्यक्षेत्रातील सर्व कर आकारणी वार्डामध्ये मालमता कर वसुली शिबीरांचे आयोजन करण्यात येत आहे. परंतु सन २०२५-२६ मधील मालमता कर वसुलीचा ओघ फारच कमी असून सदर कर वसुली ही नगण्य असल्याचे निर्दशनास येते.

मालमत्ता कराचे थकीत रक्कमेवर महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, अनुसूचि "ड" प्रकरण ८ नियम ४१ अन्वये मालमत्ता कराच्या थकीत रककमेवर शास्तीची आकारणी करण्यात येते. सन २०२५-२६ मध्ये जास्तीत जास्त मालमत्ता धारकांनी थकबाकीसह कराचा भरणा करावा मालमत्ता कराचे १००% वसुलीचे उद्दिष्ट पुर्ण व्हावे याअनुषंगाने उपरोक्त परिस्थीती विचारात घेता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, अनुसूचि "ड" प्रकरण ८ नियम ४१ अन्वये मालमत्ता कराच्या थकीत रककमेवर आकारण्यात आलेल्या शास्तीच्या रक्कमेमधून नियम ५१ अन्वये सुट प्रदान करणेकरीता विशेष योजना राबविण्याची बाब विचाराधीन आहे.

त्याअनुषंगाने सन २०२५-२६ करीता मालमत्ता कराची रक्कम, निश्चित करण्यात आलेली मालमत्ता कराची चालु वर्षाची मागणी व थकबाकीच्या एकुण रक्कमेचा एकमुस्त भरणा करणा-या मालमत्ता धारकान महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, अनुसूचि "ड" प्रकरण ८ नियम ५१ अन्वये प्राप्त अधिकारानुसार, रक्कमेवर महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, अनुसूचि "ड" प्रकरण ८ नियम ४१ अन्वये मालमत्ता कराच्या थकीत रक्कमेवर आकारण्यात आलेल्या दरमहा २ टक्के शास्तीच्या रक्कमेवर आदेशाचे दिनांकापासून खालील नमुद प्रमाणे सुट प्रदान करण्यात येत आहे.

निश्चित करण्यात आलेली मालमत्ता कराची चालु वर्षाची मागणी व थकबाकीसह मालमत्ता कराच्या एकुण रक्कमेचा एकमुस्त भरणा दि. ०६ डिसेंबर ते *दि. २१डिसेंबर २०२५ पर्यंत* करणा-या मालमत्ता धारकांना महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, अनुसूचि "ड" प्रकरण ८ नियम ४१ अन्वये आकारण्यात आलेल्या दरमहा २% शास्तीपोटी देय असलेल्या *शास्तीच्या रक्कमेवर १००% सुट* महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, अनुसूचि "ड" प्रकरण ८ नियम ५१ अन्वये देण्यात येत आहे.

उपरोक्त विशेष योजनेच्या अनुषंगाने पुढीलप्रमाणे आदेशीत करण्यात येत आहे.

| अ.क्र. | कार्यवाही | संबंधीत विभाग / अधिकारी |
|---|---|---|
| १. | - उक्त आदेशानुसार संगणक प्रणालीत आवश्यक फेर बदल तात्काळ स्थापत्य कन्सलटंट या कपंनीकडून करून घ्यावेत.<br>- झोन कार्यालयाकडून प्राप्त माहितीचा एकत्रित दैनंदिन अहवाल माझे समक्ष सादर करावा.<br>- महानगरपालिकेचे संकेतस्थळावर अद्यावत माहिती सातत्याने प्रकाशीत करावी. Bulk SMS System द्वारे नागरीकांना SMS पाठवून प्रसिध्दी देण्यात यावी तसेच | उपायुक्त (कर) |

संगणक विभाग म.न.पा.
आ.क्र. 2263
दि. 03/12/25



Scanned with OKEN Scanne
Scanned with OKEN Scanner

| | | |
|---|---|---|
| | सोशल मिडीयाचे माध्यमांतून मोठया प्रमाणात प्रसिध्दी करावी.<br>- ज्या मालमत्ता धारकांनी मालमत्ता करासह शास्तीच्या रक्कमेचा भरणा केला असेल अशा मालमत्ता धारकांची भरणा केलेली शास्तीची रक्कम पुढील आर्थिक वर्षाच्या कराच्या रक्कमेमध्ये समायोजन करण्याबाबतची कार्यवाही करावी.<br>- Online Payment Gateway ( Net Banking, PayTM, Google pay, Phone pay, pos machines, Mobile app) इत्यादी अद्यावत सुविधा नागरीकांना कर भरणा करण्यासाठी उपलब्ध करून दयाव्यात. याकरीता स्थापत्य कन्सलटंट या कपंनीकडून करून घेण्यात यावे. | |
| २. | - आदेशाचे अनुपंगाने झोन कार्यक्षेत्रामध्ये व्यापक प्रसिध्दी करावी.तसेच विविध ठिकाणी मालमत्ता कर वसुली शिबीरांचे आयोजन करून जास्तीत जास्त मालमत्ता कर वसुलीचे उदिदष्ट साध्य करावे.<br>- संबंधीत झोन कार्यालयाचे प्रशासकीय इमारतीमध्ये मालमत्ता कर वसुली करीता स्वतंत्र्य कक्ष स्थापन करावा. या कक्षामध्ये जनरल काउंटर लिपीकाची नियुक्ती करावी.<br>- मालमत्ता कर वसुली बाबतचा तसेच आदेशानुसार दिलेल्या सवलतींचा दैनंदिन अहवाल कर विभागास सादर करावा. या कामी स्थापत्य कन्सलटंट या कपंनीकडून करून घेण्यात यावे. | सहाय्यक आयुक्त १,२,३,४ व ५ |
| ३. | उक्त विशेष योजना राबविण्याकरीता करदात्यांकडून मोठया प्रमाणात प्रतिसाद मिळावा यासाठी सदर योजनेच्या तपशिलाबावतविविध प्रसारमाध्यमांतून सातत्याने प्रसिध्दी दयावी. | जनसंपर्क अधिकारी |
| ४. | योजनेबाबतची माहिती विविध व्हॉटअॅप ग्रुप/ सोशल मिडीयांचे माध्यमांतून सातत्याने प्रसारीत करावी. | सिस्टीम मॅनेजर |
| ५. | महानगरपालिकेचे परिवहन बस, उद्यान, बाजारपेठेचे ठिकाण, धार्मीक स्थळे इत्यादी ठिकाणी फलक लावण्या बाबतची कार्यवाही करावी.<br>- महानगरपालिकेचे Advertising sites वर Hording लावून तसेच खाजगी Advertising sites वर एजन्सीला विनंती करून प्रसिध्दी दयावी. | अधिक्षक बाजार व परवाना |
| ६. | दैनंदिन घनकचरा संकलन करण्याकरीता कार्यरत अॅटोवरील ध्वनीप्रक्षेपकांमार्फत विशेष योजनेबाबतची माहिती नागरीकांना दयावी. | वैद्यकीय अधिकारी (स्वच्छता) |

उक्त योजनेची व्यापक प्रसिध्दी होवून जास्तीत जास्त नागरीकांना लाभ होईल व जास्तीत जास्त थकीतकराची रक्कम महानगरपालिका निधीत जमा होईल, याहेतुने झोन स्तरावर यंत्रणा कार्यरत ठेवण्यात येईल याबाबत सहाय्यक आयुक्त यांनी दक्षता घ्यावी. प्रत्येक कर निरिक्षक, स्थापत्य अभियांत्रीकी सहाय्यक, कर वसुली लिपीक यांनी आपले अधिनस्त कार्यक्षेत्रातील थकबाकीदारांना प्रत्यक्ष भेट देवून भ्रमणध्वनीद्वारे संपर्कसाधून मालमत्ता कर सुट बाबतचे योजनेचा लाभ घेण्याकरीता प्रवृत्त करावे.

उक्त आदेश तात्काळ अंमलात येतील.

(सौम्या शर्मा – चांडक, भा.प्र.से.)
आयुक्त
महानगरपालिका अमरावती

प्रत -

१. उपायुक्त (कर)
२. सहाय्यक आयुक्त १,२,३,४ व ५
३. वैद्यकीय अधिकारी (स्वच्छता)
४. सिस्टीम मॅनेजर
५. अधिक्षक बाजार व परवाना



Scanned with OKEN Scanne
Scanned with OKEN Scanner

६. जनसंपर्क अधिकारी

७. संचालक, स्थापत्य कन्सलटंट (इ.) प्रा. लि. अमरावती.

प्रतिलीपी –

१. मा. प्रशासक, महानगरपालिका अमरावती यांचे माहिती करीता सादर.

२. अतिरिक्त आयुक्त (१,२ ),महानगरपालिका अमरावती यांचे माहिती करीता.

३. उपायुक्त (१,२,३,४), महानगरपालिका अमरावती यांचे माहिती करीता.

४. मुख्यलेखाधिकारी / मुख्यलेखापरिक्षक, महानगरपालिका अमरावती यांचे माहिती करीता.

-sd-

(सौम्या शर्मा – चांडक, भा.प्र.से.)
आयुक्त
महानगरपालिका अमरावती

Scanned with OKEN Scanner
Scanned with OKEN Scanner
Scanned with OKEN Scanner